INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 8.428 (SJIF 2026)

# मराठी बाल साहित्य : संकल्पना व स्वरूप विशेष

**डॉ. रमेश जाधव**

वरिष्ठ प्राध्यापक तथा विभागप्रमुख,
मराठी विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र, भारत)
E-mail: prof.rameshjadhav2021@gmail.com

**DOI No. 03.2021-11278686 DOI Link :: https://doi-ds.org/doilink/03.2026-35538675/IRJHIS2603037**

**प्रास्ताविक :**

बाल या संज्ञेत शिशू, किशोर आणि कुमार या बालपणातील बदलांचा समावेश होतो. जे मानवी जीवनातील एक स्वतंत्र दालन आहे. लहान मुल प्राथमिक स्तरावर पंचेद्रियांद्वारे ज्ञान ग्रहण करते. त्याच्या बालविश्वाचा जवळचा स्नेहबिंदू आई असते. लहानपणी आजी, आजोबा, बाबा इत्यादी नात्यांची भावनिक पदरे त्याच्या व्यक्तिमत्वाला आकार देतात. भाषाविकास, संस्कृती, आचार, विचार, मूल्यात्मक शिकवणीमुळे बालकाच्या व्यक्तिमूल्याला सुआकार प्राप्त होतो. सभोवतालचा परिसर, निसर्ग, पशु, पक्षी, प्राणी या नौसर्गिक गोष्टीमुळे बालकाचे मनोविश्व रुंदावते. देह, मन इंद्रिय, मेंदू आणि ह्रदय यांची निसर्गदत्त येणारी समज हळूहळू यामुळे बालकात उत्क्रांत होत जाते. निरीक्षण, अनुकरण, अनुसरण आणि अनुकृतीतून प्रत्यक्ष कार्याचा अनुभव घेण्याची विविध कौशल्ये बालवयात सहजपणे जोपासली जातात. यामुळे बालकाचे अनुभव विश्व हळूहळू विकसित होत जाते.

**विषय प्रवेश :**

**बालसाहित्याचा प्रारंभ :**

बालसाहित्याचा प्रारंभ साधारणत: चक्रधर स्वामीने महदाईसाला सांगितलेल्या पुढील कथेतून सांगता येईल. “साळेचे घर मेण्याचे : काऊळ्याचे घर सेणाचे”[१] म्हणजे मध्ययुगीन मराठी महानुभवानी निर्माण केलेल्या साहित्यातून बालसाहित्याचा आरंभ झालेला आहे. या संदर्भात हिंदीमधील बालसाहित्याचे अभ्यासक संगीता गुप्ता लिहितात “हमारे देश में प्राचीनकाल से ही बालसाहित्य लिखा जाता रहा है। पंचतंत्र, कथा, सरित्सागर, हितोपदेश, नीतीकथाओ तथा

लोककथाओं का अथाह भणडार इस तथ्य का साथी है। पंचतंत्र तो ऐसी अनूठी और अनमोल कृती है जिसकी मिसाल पुरे विश्व के बालसाहित्य मे नही मिलती।"[२]

**बालसाहित्य निर्मिती अवघड प्रक्रिया :**

बालसाहित्य निर्मिती ही अत्यंत अवघड प्रक्रिया आहे. अनुभवांना सामोरे जाणे आणि तीव्र अशा अनुभवांना समर्थ भाषेत व्यक्त करणे हे बालसाहित्तेतर साहित्यिकांना आव्हान असते. बालसाहित्य लेखनप्रवाह हा उलट्या बाजूचा असतो. म्हणजे बालवाचकांना जे आवडेल, रुचेल त्याचप्रमाणेच लिहून वाचकाच्या पातळीवर जाऊन शब्द शोधायचे हा एक प्रकारे बालमनाचा अंकुशच लेखकावर असतो. ललित लेखनात लेखक हा आपल्या वाचकांना आपल्यापर्यंत येण्याचा आग्रह धरत असतो तर बालसाहित्याचा वाचक लेखकाला आपल्या पातळीवर येण्यासाठी सांगत असतो. "बालसाहित्य लेखन निर्मिती करणे हे सर्वात कठीण असते. कारण आपण आहोत त्यापेक्षा अधिक लहान होणे तसे खूप अवघड असते. येथे लहान होणे म्हणजे बालमन साधारण करणे होय. म्हणजे निष्पाप होणे. वाघाची दृष्टी फेकून देऊन हरणाची दृष्टी धारण करणे. जात, धर्म, वंश, लिंग सर्व-सर्व काही विसरून निसर्गाशी एकरूप होणे असा होतो"[३] आज बालसाहित्याचे लेखन हे विश्वभराच्या साहित्यिकांना खूप आव्हान म्हणून उभे राहिलेले आहे.

बालसाहित्य ही संकल्पना स्पष्ट करण्यासाठी काही अभ्यासकांच्या व्याख्यांचा आधार घेता येईल.

**'बालसाहित्य'- व्याख्या :**

**डॉ. सुलभा शाह** बालसाहित्य म्हणजे काय हे स्पष्ट करताना म्हणतात, "जे विचारशक्तीत भर घालते त्यांच्या शंकेचे निरसन करते, त्यांच्याशी हितगुज करते, त्यांना चांगले कोणते ? हे समजावून सांगते, त्यांच्या भावभावनांना संवेदनांना व्यापकत्व देते आणि हे सर्व करीत असताना त्यांचा शब्दसंग्रह वाढविते असेच वाङ्मय बालवाङ्मय होय."[४] तर हिंदी साहित्यिक **श्री. निरंकार देव सेवक** यांच्या मतानुसार, "जे साहित्य बालकांचे मनोरंजन करील, ज्यात बालकांना रस वाटेल व ज्याद्वारे आपल्या भावना व कल्पनांचा विकास बालक करू शकतील त्याला बालसाहित्य म्हणावे"[५] बालसाहित्य या संकल्पने विषयी **सौ. मालतीबाई दांडेकर** म्हणतात,"बालमनाला स्पर्श करणारी आणि त्याच्या जीवनावर सुसंस्कार करणारी स्फुर्तीदायक रचना म्हणजे बाल वांङ्मय होय."[६]

वरील सर्व व्याख्यांच्या परामर्श घेतल्यावर बालसाहित्य म्हणजे काय याचा आपल्याला उलगडा होतो. सुसंस्कारशील जीवन जगण्यासाठी जी धडपड करावी लागते. त्यासाठी प्रेरणादायी विचारांची शिदोरी बालसाहित्यातून मिळते. जसे की महापुरुषांची जीवनचरित्रे, स्फूर्तीदायक रचना त्याचबरोबर बालकांच्या भावभावना, संवेदनांना व्यापकत्व देऊन सुसंपन्न व्यक्तिमत्त्व घडवण्यामागे बालसाहित्याचा खूप मोठा वाटा आहे. हेही याठिकाणी लक्षात येते.

**बालसाहित्य आणि बालमनाचे विविध गुणधर्म :**

**१. नाविण्याची ओढ :**

सृष्टीकडे पाहण्याची संवेदनशील दृष्टी बालकाकडे नाविन्याच्या ओढीने तीव्र होते. निसर्गातील वेली, पशुपक्षी,

प्राणी याकडे तो खेळकर वृत्तीने पाहतो. जे दिसते त्याबद्दलची जाणून घेण्याची ओढ हा त्याला शांत बसू देत नाही. मग सूर्य, चंद्र, तारे, चांदणे त्याच्याशी मैत्री करतात. याचे कारण बालमनास नवतेची विलक्षण ओढ असते.

**२. मानवीकरणाची दृष्टी :**

ही दृष्टी बालकांमध्ये अधिक संवेदनशील असते. मुले लहान दगड, फुले, वृक्ष यांच्याशी मानवासारखे खेळतात. निर्जीव वस्तूंमध्ये सजीवत्त्वाचा गुण बालके पाहतात. फुलपाखरू, कुत्रा, मांजर यांच्याशी बालके खेळतात. म्हणजे निर्जिव वस्तू किंवा निसर्गाला ते मानवी रुप बहाल करतात. यालाच मानवीकरणाची दृष्टी असे म्हणता येईल.

**३. जाणून घेण्याची जिज्ञासा :**

मुल जिज्ञासेपोटी ज्ञानग्रहण करतो. त्याच्या बुद्धीला अवतीभोवतीच्या सजीवसृष्टी बद्दल जाणून घेण्याच्या जिज्ञेसेमुळे असंख्य प्रश्न त्यांनाच निर्माण होतात. जसे-जसे निरीक्षण शक्ती त्यांची वाढते. तसतसे त्यांच्या जिज्ञेसेचे क्षेत्र विस्तारते. येणाऱ्या जाणाऱ्यांचे, पशु-पक्ष्यांचे, वाहनांचे, वाऱ्यांचे, हलणाऱ्या पानांचे निरीक्षण ते करू लागते. जिज्ञासेपोटी येणारे प्रश्न थेट स्वच्छ, मुक्त असतात. मुलांचे प्रश्न आणि कल्पनाशक्तीचा आधारे दिलेली उत्तरे यातूनही अनेक बालगीतांचा जन्म झालेला आहे.

**४. कल्पना विश्वात रममान होणे :**

कल्पनाविश्वात रममान व्हायला लहान मुलांना अधिक आवडते. त्यांच्या याच गुणधर्माला जाणून साहित्यिक कल्पनांचे विश्व रममाण होण्यासाठी खुले करतात. लेखक कल्पना शक्तीच्या जोरावर हे साकार करतो. यासाठी विंदांच्या कवितेचे उदाहरण देता येईल.

"एकदा काय झाले, एकदा काय झाले
पक्षी उडून गेले, म्हणून झाड उडून गेले"[७]

**५. अनुकरणशीलता :**

हा जन्मतः असलेला स्वभाव गुणधर्म बालकांमध्ये दिसतो. बालमन मोठ्यांचे, मानवेत्तर प्राण्यांचे जसे बघितले, ऐकले तसेच हुबेहूब अनुकरण करते. लहान मुली स्वयंपाक घरातील आईच्या पोळ्या लाटण्याचे अनुकरण करतात. तर आजी-आजोबांच्या लकबी, आई-वडिलांच्या सारखे वावरणे या बाबातीत सर्वच मुले अनुकरण करतात. अनुकरणशीलता बालकांमध्ये चांगल्या विचारांची, महापुरुषांच्या चरित्रांची नैतिक संस्काराची शिदोरी घडविणारी ठरते.

**६. अद्भुतरम्यता :**

परी, राक्षस, स्वर्ग, राजा, राणी यांच्या अद्भूत व आश्चर्यचकीत घटना व गोष्टी याकडे लहान मुले पटकन आकृष्ट होतात. कळीतून उमलणारे फुल, जमिनीत अंकुरणारे बियांचे कोंब, वाऱ्यामुळे पानांचा होणारा सळसळ आवाज, नुकतेच जन्मलेले शेळीचे पिल्लू भीत-भीत हातात घेतल्यावर आलेला अनुभव हे देखील अद्भुतच असते.

याचाच अर्थ अदभूत गोष्टी लहान मुलांच्या मनावर बिंबतात. त्यांना त्या खिळवून ठेवतात. म्हणून अदभूतरम्यता बालमनाचे गुणधर्म ठरते.

**७. कृतीप्रधानता :**

चंचलता हा बालकांचा स्वभाव धर्म ओळखून बालसाहित्यात फास्टर फेणे, बोक्या सातबंडे असे बालनायक बालसाहित्यातून उभे केलेले आहे. एका जागी जास्त वेळ स्थिर बसायला मुलांना कंटाळवाणे वाटते. शरीरात प्रचंड ऊर्जा खेळत असल्यामुळे सतत शारीरिक कृती करावीसी त्यांना वाटते. राजकन्येला राक्षसाने पकडले तर लगेच तिला वाचविण्यासाठी राजपुत्र जणू तयारच असतो. असे बालमन क्रियाशील झालेले असते. घरभर वाऱ्यासारखे सकाळ ते संध्याकाळी झोपेपर्यंत अशा रम्य हालचाली त्यांच्याकडून झालेल्या असतात. त्यांच्या स्वभाव धर्माला ओळखून बालसाहित्यात मोठ्या प्रमाणावर कृतीप्रधानता दिसते.

**८. सूक्ष्म निरीक्षणशक्ती विकसित करणे :**

पावसाळ्यात आकाशी दिसणारा रंगीबिरंगी इंद्रधनुष्य, ढगांमुळे आकाशात तयार होणारे विविध आकार, फुलझाडांवर बागडणारी रंगीबिरंगी फुलपाखरे, हळूहळू जमिनीवर चालणारी गोगलगाय सुद्धा बालकाच्या नजरेतून सुटत नाही. शिस्तीत एका रांगेमध्ये चालणाऱ्या मुंग्यांचे त्यांना आश्चर्य वाटते. पुंगी वाजविल्यामुळे डोलणारा नाग बऱ्याच कुतूहलाने बालके न्याहाळत असतात. बालसाहित्याकांना बालकांच्या या सूक्ष्म निरीक्षण शक्तींना विकसित करण्यासाठी अत्यंत संवेदनशील होऊन लेखन करावे लागते.

**९. विनोदाची आवड :**

विनोद निर्माण झाला की बालके हसतात. ही निसर्ग दत्त देणगी फक्त मानवालाच मिळाली आहे. विदूषकाचे खेळ, कुणाची फजिती, कोणी घसरून पडलेले पाहून, माकडाच्या लीला व अतिशयोक्तीपूर्ण वर्णने, खलपात्राची फजिती हे साहित्यातील विनोदाचे विषय बालमनाला हसण्यासाठी निर्माण करतात.

**१०. लटका संघर्ष :**

लहान मुले खेळता खेळता लगेचच भांडतात व गोडही होतात. त्यांची क्षणात कट्टी तर क्षणात गट्टी होते. सगळेच व्यवस्थित चाललेले असताना भांडणे होतात. ती मात्र एवढी टोकाची नसतात. बालसाहित्यिक हा एक प्रकारचा संघर्ष सुद्धा साहित्यात बालमन लक्षात घेऊन उभे करतात. हा संघर्ष लहान-मोठा, चांगला-वाईट, एवढ्यावरच सीमित असतो. तो हिंसक नसतो. म्हणून क्षणिक संघर्ष बालसाहित्याचा एक महत्त्वाचा गुणच ठरतो.

**११. उत्कटतेचे दर्शन घडविणे :**

लहान मुले प्रत्येक गोष्टीचा अनुभव तीव्रतेने घेतात. आनंद, सुख वाटले की त्यांच्या प्रतिक्रिया मोठ्याने हसून टाळ्या वाजवून तो दर्शवित असतो. उड्या मारणे, टाळ्या देणे, पाठलाग करणे असे निरागस, स्वच्छंदी बालपण खेळकर असते. जगाच्या दु:ख निरासन, अपयश समस्यांपासून ते दूर असते. भावना प्रकट करताना कोणताच संकोच

मनात न ठेवता प्रकट करते. बालसाहित्यकाला या उत्कटतेचे दर्शन साहित्यातून घडवायचे असते.

**१२. निरपेक्ष प्रेमभाव :**

मनुष्यासोबतच पशुपक्षी, चांदण्या, चंद्र यांच्यावर सुद्धा बालके प्रेम करतात. त्यांच्या प्रेमाला मोजता येत नाही. फायदा-तोटा हा भेदभाव सुद्धा त्यांच्या प्रेमात नसतो. प्राण्याविषयी वात्सल्य, सोबती आणि खेळण्याविषयी स्नेह, अनोळखी व्यक्तीबद्दल जिव्हाळा त्यांना असते. यामुळेच पाण्यात पडलेल्या मुंगी बद्दल बालसाहित्यात कबुतराला दया वाटते. दयेची भीक मागणाऱ्या उंदराला सिंह सोडून देतो. खलपात्रांना सुद्धा खूप वाईट शिक्षा झालेली त्यांना पहावत नाही. यालाच निरपेक्ष प्रेमभाव म्हणतात. थोडक्यात मुलांच्या मनाचे हे गुणधर्म वयानुरूप बदलणारे असतात.

**मराठी बालसाहित्याचे उद्देश :**

**१. करमणूक करणे :**

बालसाहित्यातून मुलांची करमणूक घडावी, वास्तव जीवनाचा विसर पडावा हा विचार साहित्यिकांनी केलेला असतो. हालचाल, गती, प्रकाश, ध्वनी लय या गोष्टी मुलांना आकर्षण घेणाऱ्या असतात. घटना व कृती प्रधानता, रहस्य व हास्य प्रधानता त्याचबरोबर नादमधुरता, श्रुतिमधुरता, तालबद्धता या वैशिष्ट्यांमुळे बालसाहित्य मनोरंजक ठरते. लहान मुलांचे सर्वांगीण मनोरंजन झाल पाहिजे या हेतूने बालसाहित्याची निर्मिती करण्यात आली.

**२. ज्ञानकक्षा विस्तारीत करणे :**

बालसाहित्य वाचनाने बालकांच्या ज्ञानकक्षा विस्तारतात. वैयक्तिक विकासास पूरक असल्यामुळे सभोवतालचा परिसरांचे बालकाला ज्ञान होते. त्याचबरोबर सामाजिक जीवनातील शिष्टाचार प्राप्त होते. ल. म. कडू यांनी निसर्गाच्या उत्पत्तीक्रमावर 'झाड' हे सुंदर पुस्तक लिहिले आहे. झाड मोठे कसे होते याविषयी मुलांना जिज्ञासा असते. स्वच्छता, एकमेकांविषयी समायोजन, समानता, मानवता कारुण्य जगाविषयी आस्था, निसर्ग प्रेम अशा अनेक मूल्यांचा खोल संस्कार बालसाहित्यातून उपदेशकाची भूमिका न घेता बालसाहित्यकाराला करता येते.

**३. संस्कारशील विचार रुजविणे :**

बालसाहित्य वाचनामुळे वाचकाच्या मनावर संस्कारशील मूल्यांची रुजवणूक होते. मातृ-पितृ सेवा, राष्ट्रभक्ती, स्त्री-पुरुष समानता, पर्यावरणरक्षण, इतिहासाचा अभिमान, राष्ट्र महापुरुषांच्या जीवन चरित्राची जडण-घडण याचा परिणाम बालमनावर होतो. भावी उज्ज्वल नागरिक घडविण्यासाठी बालसाहित्यातून मूल्यांची शिदोरी देण्याची लेखकावर जबाबदारी असते.

**४. आनंदप्राप्ती करणे :**

बालसाहित्य वाचनामुळे उच्चतर आनंदाची प्राप्ती होते. लेखकालाही लहान मुलांची निरागसता, स्वाभाविकता, वर्तमानात रममाण होण्याची वृत्ती, रचनातंत्राशी तादात्म्य पावण्याची वृत्ती अंगी बाणवता आली तर उत्तम बालसाहित्य निर्मिती होते.

**मराठी बालसाहित्याचे विशेष :**

**१. काल्पनिकता :**

मुळात बालसाहित्याचा प्रांत हा काल्पनिक आहे. कल्पना फक्त मनुष्यच करू शकतो. वास्तव जीवनापेक्षा प्रत्यक्षात अस्तित्वात नसलेल्या गोष्टीचे कल्पनेने चित्र रंगवण्याची वास्तवात नसलेल्या एक अद्भुत जग निर्माण करण्याची क्षमता म्हणजे कल्पनाशीलता होय. जी सर्वच साहित्य निर्मितीच्या मुळाशी आहे. त्यास बालसाहित्यही अपवाद नाही.

**२. तर्कहीनता :**

मानवप्राणी बोलतो पण मानवेतर प्राणी सुद्धा बोलतात, हसतात, खेळतात. ही तर्कहीनता असते. बौद्धिक तर्क परंपरा मोडून अवास्तव गोष्टींचे वास्तवाप्रमाणे हेतूपूर्वक मांडणी करून एक वेगळीच सृष्टी निर्माण करणे म्हणजेच तर्कहीनता होय. याबद्दल वि. स. खांडेकर यांची 'फुले आणि दगड' ही एक छान बालकथा उदाहरण म्हणून घेता येईल. फुले दगडाला हिणवतात. पुढे एक पाथरवट जंगलात मूर्ती घडविण्यासाठी पाषाण शोधायला येतो. दगडावर छन्नी हातोड्याचे घाव घालून सुंदर देवाच्या मूर्तीचे शिल्प दगडातून साकार करतो व जी फुले हिनवत होती ती फुलेच तोडून मूर्तीला अपर्ण करतो. हा प्रसंग तर्कहीनता आहे. तर्कहीनता गोष्टी स्वीकारूनच जाणीवपूर्वक पुढची मांडणी बालसाहित्यात झालेली असते.

**३. अनुनयक्षमता :**

बालकांची कथेबद्दल उत्कंठा वाढविण्यासाठी अनुमान न करता येणाऱ्या गोष्टींची निर्मिती करण्याची क्षमता म्हणजे अनुनयक्षमता कथासाहित्यामध्ये बऱ्याचदा काही घटना अचानक घडतात. काही पात्रांचे कथेत अचानक आगमन होते. पुढे काय होणार हे सांगता येत नाही. अशावेळी बालकांची उत्कंठा वाढत जाते. 'मोहिनी आणि भस्मासुर' या कथेला पुराणातल्या विष्णूच्या मोहिनी रूपाच्या कथेची पार्श्वभूमी आहे. जादूच्या शक्तीमुळे उन्मत होऊन भस्मासुर राक्षस माणसाला जाळून खाक करतो. हे संकट दूर करण्याचे आव्हान छोटीशी शाळकरी मुलगी स्वीकारते. तेव्हा एवढीशी मुलगा हे आव्हान कसे पेलणार. असा बालबुद्धीला प्रश्न पडतो. याबद्दल अनुमान करता येत नाही. पुढे हीच मुलगी या राक्षसाला नृत्यात गुंतवून त्याचा हात त्याच्या डोक्यावर ठेवायला लावते आणि तो भस्म होतो व शेवट गोड होतो.

**४. श्रवणक्षमता :**

बालसाहित्यात श्रवणरम्यता विशेषत्वाने येते. बालकांना रचनेत गुंतवून ठेवण्यासाठी श्रवणरम्यता महत्त्वाची ठरते. त्यावरच बालसाहित्य सकस ठरते. देविदास बागुल म्हणतात, "श्रवण रम्यतेसाठी काही अक्षरांची, शब्दांची पुनरावृत्ती जशी हवी असते तशीच पुनरावृत्ती संबंध गोष्टीत एखाद्या कवीची प्रश्नोत्तराची हवी असते. पुनरावृत्तीने संबंध गोष्टीला एक प्रकारे तालबध्दता येते."[८] बालसाहित्यात ही तालबद्धता अत्यंत आवश्यक आहे.

"गाडी आली, गाडी आली झुक झुक झुक

इंजिनची सिटी कशी वाजे बघा, कुक कुक कुक"[९]

वरील काव्यात विशिष्ट शब्दांची पुनरावृत्ती साधल्यामुळे नाद, लय, तालबध्दता बालगीतांमध्ये येते. मुले लयीमुळे सुरुवातीला आकर्षित होतात. नंतर स्वरांकडे म्हणून बालकांना बालकविता खूप भावतात.

**५. घटनाप्रधानता :**

प्रौढ साहित्यापेक्षा बालसाहित्याकडे बालके घटना प्रधानतेमुळे अधिक खेचले जातात. बालकथेचे कथानक हे सतत हालते. पुढे पुढे जाणारे, बालकांचे मन गुंतवणारे असावे. उदाहरणार्थ वेताळ बत्तीशी या कथेत विक्रमाच्या पाठीवर वेताळ बसून एक एक कथा सांगतो. कथेतील घटना क्रमाने व हलक्या स्वरूपाच्या असतात. पुढे काय घडेल याची उत्कंठाही वाचकाला लागलेली असते. कोडीवजा कथेत ते सूत्र असते.

**६. सचित्रता व सजावट :**

बालसाहित्यातील कविता, कथा, कादंबरी यातील मुखपृष्ठ व आतील पानांवर काढलेल्या चित्रांमुळे एक जीवंतता येते. आपलेपणा वाढतो. उदाहरणार्थ 'पावसाची कविता' असेल तर टप टप पावसाचे थेंब, बेडकांची गर्दी, पानावरची ओघळणारे पाणी. ओढा, पक्षी, वेली, फुलझाडे जे अवतीभोवती पाहतो. ते चित्रातून भेटल्यामुळे एक आनंदी वातावरण निर्माण होते. यामुळे मुले साहित्य वाचण्यास प्रवृत्त होतात. याबद्दल देविदास बागुल म्हणतात ऑल इन वंडरलँड या पुस्तकातील टेनिएल ने काढलेल्या चित्रांनी ऍलिसला कसे व्यक्तिरूप आणून दिले याचे एका रसिकाने वर्णन करताना म्हटले आहे की, टेनिएलने काढलेल्या चित्रांची आम्हाला इतकी सवय झाली आहे की त्या चित्रांशिवाय ऐलिसचे पुस्तक तितके चांगले होईल की नाही याची आम्हाला शंका येते. "[१०]

आज मुद्रणकला विकसित पावल्यामुळे सजावटही डिजिटल झाली आहे. हुबेहुब चित्रे, आकृत्या, निसर्ग, छायाचित्र, मुखपृष्ठ व मलपृष्ठावर दिसते. दिवसेंदिवस बालसाहित्यात सजावटी बरोबर चित्रालाही महत्त्व प्राप्त झाले.

**उपसंहार :**

मराठी साहित्यविश्वात बालासाहित्याने स्वतःचे अस्तित्व आज सिद्ध करून कथा, कविता, नाटक, कादंबरी, चरित्र, नाटक इत्यादी बालसाहित्य अंगाने आज समृद्ध व मान्यता पावलेले आहे. या बालसाहित्याच्या केंद्रामध्ये बालपण हे केंद्रीभूत असते. बालपणाच्या वेगवेगळ्या अवस्था बालसाहित्य आविष्कृत करते. महानुभव संप्रदायाच्या साहित्यातील चिमणी आणि कावळ्याची गोष्ट ही बाल साहित्याची पाहाट आहे. इसापनीती, पंचतंत्र, हितोपदेश, वेताळ पंचवीशी इत्यादी साहित्य अनुवादाच्या रूपाने प्रारंभी हेतूपूर्वक बालकांसाठी लिहिले गेले. हे प्रयत्न कमी असले तरी बालसाहित्याची सुरुवात अशावादी होती. जे पुस्तक बालकाला हसवते, रडवते उच्च तर भावना मनात उचंबळून आणतात. विचार, भाषा, आचार यावर मूल्यात्मक आशावादी जीवन दृष्टिकोन जोपासून बालसाहित्य बालमनावर स्थिरावते. एवढेच नसून यशस्वी पावते तेच बालसाहित्य होय. बालसाहित्याचा अविभाज्य घटक म्हणजे निसर्ग हा

बाल्यावस्थेत अधिक स्पर्श, नाद, लय, हळुवारपणा, कोमलता मनाला आल्हाद देणारा असते. निसर्गातील पशुपक्षी, प्राणी, फुले, वेली, डोंगर, नद्या, पर्वत याकडे बालक जणू सूक्ष्म निरीक्षणाने पाहतो व तेच बालसाहित्य साहित्यातून भरभरून बालकाला भेटण्याची एक पर्वणी देत असतो. बालविश्वाचे व्यासपीठ म्हणून आज बालसाहित्य तितकेच खंबीरपणे उभे आहे. आनंदनिर्मिती हे कलात्मक दृष्ट्या बालसाहित्याचे अत्यंत उच्चतर प्रयोजन आहे. ज्ञानविस्तार, मनोरंजन, मूल्य संस्काराची रुजवणूक ही इतरही प्रयोजने तितकीच बालसाहित्य निर्मितीत महत्त्वाची आहेत. बालसाहित्य बालकांच्या पसंतीतील उतरण्याचे कारण म्हणजे बालसाहित्यात अंतर्भूत असलेली वैशिष्ट्ये होय. अतार्कीकता अनुनमेयता, बालमनससंबध्दता, श्रवणरम्यता, सचित्रता व सजावट इत्यादी बालसाहित्याचे विशेष असून त्यामुळे बालसाहित्य मुलांना भावते.

**ठळक निष्कर्ष :**

१. पंचेद्रियांद्वारे बालक ज्ञानग्रहण करत असताना नाद, लय, ठेका आणि अनुप्रासयुक्त रचना बालकला आकर्षित करत असतात.

२. बालकाची मूल्यात्मक गुणांची वाढ करण्यासाठी बालसाहित्य मैलाचा दगड आहे.

३. बाल या संज्ञेत शिशु, बाल, किशोर व कुमार अशा बालपणातील सर्वच अवस्थांचा निर्देश होतो.

४. बालसाहित्याच्या आस्वादामुळे बालक अनुभवसंपन्न, ज्ञानसंपन्न आणि गुणसंपन्न होतो.

५. मराठी बालसाहित्याने बालकथा, बाल कादंबरी, बालनाट्य, बालचरित्र इत्यादी प्रकारांनी साठोत्तरी साहित्य प्रवाहात स्वतःचे अस्तित्व निर्माण केले आहे.

६. बालकांच्या आवडी-निवडी लक्षात घेऊन मनोरंजन, उद्बोधन, मूल्यात्मक जाणिवा वृद्धींगत करण्यासाठी बालसाहित्य महत्त्वाचे योगदान देत आहे.

७. बालसाहित्य लेखन करणे ही अवघड आणि तारेवरची कसरत व व बालकासाठी लेखन करणे निष्ठापूर्वक जोपासले जाणारे व्रत आहे.

८. बालसाहित्याची निर्मिती मनोरंजन, उद्बोधन, आनंद आणि ज्ञान विस्तारासाठी असते.

९. जीवनमूल्यांची रुजवणूक बालसाहित्यातून होत असते.

१०. कल्पनाशीलता हा बालकाचा बालसाहित्याचा स्थायीभाव आहे.

११. अतार्किकतेवर बालमनाच्या विचारांची जाणीवपूर्वक मांडणी बालसाहित्यातून केली जाते.

१२. श्रवणरम्यतेमुळे बालसाहित्यात नाद, लय, तालबद्धता निर्माण होऊन बालमन आकर्षित होते.

१३. बालकाचे बालविश्व सचित्रता व सजावटीतून बालसाहित्याकडून साकार करण्याचे डिजिटल प्रयत्न वर्तमानात वाढत आहे.

**संदर्भसूची :**


१. कोलते वि. भी. लिलाचरित्र, संपा. शासकीय प्रत, लिळा क्र. १२४, प्रथमावृत्ती १९७८, पृ. क्र. १०२

२. सिरोठिया शकुंतला, हिंदी बालसाहित्य विविध विचार, गुप्ता संगीता, बुंदलखंड विद्यापीठ, शोधप्रबंधिका २८/१२/२००२, पृ. क्र. ५५

३. डॉ. शहा सुलभा, मराठी बालवाङ्मय, स्वरूप आणि अपेक्षा लीलावती प्रकाशन, धुळे. प्रथामावृत्ती २००१, पृ. क्र. ३६

४. दांडेकर मालतीबाई, बालसाहित्याची रुपरेषा, प्रथमावृत्ती १९६४, साहित्यकार मुद्रणालय, प्रकाशक वा. वि. भट मुंबई पृ. क्र. ८

५. डॉ. शहा सुलभा कित्ता, पृ. क्र. ३४

६. निरंकार देव सेवक, पऱ्यांची शाळा, सुभाष वसेक यांच्या ग्रंथातील प्रस्तावनेमधून उदधृत पृ. क्र. १२

७. दांडेकर मालतीबाई, बालसाहित्याची रुपरेषा, प्रथमावृत्ती १९६४, साहित्यकार मुद्रणालय, प्रकाशक वा. वि. भट मुंबई पृ. क्र.१४

८. करंदीकर विं.दा., बालकवितांचा खजिना, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई. जून २०१८, पृ. क्र. १६

९. डॉ. शहा सुलभा, मराठी बालवाङ्मय, स्वरूप आणि अपेक्षा लीलावती प्रकाशन, धुळे. प्रथामावृत्ती २००१, पृ. क्र. २५

१०. बागुल देविदास, बालवांङ्मय, चिरंजीव प्रकाशन, पुणे. पृ. क्र. ५८